**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# श्रमसंस्कार शिबिरातून श्रमाचे संस्कार घडतात : डॉ. टी. एम. चौगुले

▲पाटण, दि. ६ : श्रमसंस्कार शिबिरे काळाची गरज असून अशा शिबिरातून समाजप्रबोधन करणारे व समाजोपयोगी, नवीन उपक्रम विद्यार्थ्यांनी राबवले पाहिजेत. श्रमसंस्कार शिबिरातून श्रमाचे संस्कार घडत असतात. संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेच्या माध्यमातून काम केले. त्यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे एन. एस. एस. संचालक डॉ. टी.एम. चौगुले यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, पर्यवेक्षक प्रा. दीपक दामाडे, नॅकच्या समन्वयक डॉ. हेमलता काटे, डॉ. जी. एस पट्टेबहादूर, डॉ. भरत जाधव, प्रा. बळीराम लोहार, सलतेवाडी गावच्या सरपंच रूपाली सलते, उपसरपंच अमोल देसाई उपस्थित होते.

प्रा. डॉ. टी. एम. चौगुले म्हणाले, श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळतो तसेच त्यांच्या नैतिक मूल्यांचा विकास होतो. शिक्षणातून समाजसेवा व समाजसेवातून शिक्षण यासाठी एन. एस. एस. असते. विशेष श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थी समाजाशी जोडला जातो.

संजीव चव्हाण म्हणाले, श्रमसंस्कार शिबिर हे आयुष्य घडवित असते. राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याची ओळख करून देणे होय तसेच श्रमाचा आनंद घ्यायला शिका, असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार अध्यक्षीय भाषणात म्हणाले, या विशेष श्रमसंस्कार शिबिरात सात दिवस वेगवेगळ्या विषयांवर तज्ञ लोकांचे मार्गदर्शन होणार असून विद्यार्थी तर आहेतच मात्र ग्रामस्थांनीसुद्धा याचा लाभ घ्यावा. ग्रामस्थांच्या सहकार्यातून राबवलेले उपक्रम व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले श्रम हे गावासाठी महत्त्वाचे ठरतील असे सांगितले

कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भरत जाधव यांनी आभार मानले. कु. [illegible] केले. कार्यक्रमास ज्युनिअर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम लोहार, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. ए. ए. सूर्यवंशी, प्रा. टी. आय. पाटणकर, प्रा. व्ही. आर. शिर्के, प्रा. एस. जी. फुटाणे, प्रा. व्ही. एस. कांबळे, प्रा. एस. डी. कदम, प्रा. आर. के. शिर्के यांच्यासह मौजे सलतेवाडी गावचे पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालयातील सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.




मार्गदर्शन करताना डॉ. टी. एम. चौगुले, व्यासपीठावर डॉ. एस. डी. पवार, संजीव चव्हाण व इतर.